**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३२४/२०२३ मधील नि. १५ वरील आदेश</u>.**
**CNR No.MHAH23-000886-2023**

१. अर्ज व म्हणणे पाहिले.

२. दाव्यातील प्रतिवादी यांनी अर्जात कथन केले आहे की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरूध्द खरेदीखत रद्‍ बातल करुन मिळणेकरीता व जाहिर ठरावाकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी हजर झालेले असुन त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. सदर दाव्यात प्रतिवादीला कैफियत देणेसाठी लागणारे काही महत्वाचे कागदपत्रे तसेच जुने खरेदीखताचे कागदपत्र उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादी विरूध्द विना कैफियत दावा चालविण्याचा आदेश झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी जाणुन बजुन उशीर केलेला नाही. दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा असुन प्रतिवादीस तिची बाजु मांडणे कायदयाने व न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीस कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे प्रतिवादीचे कथन आहे.

३. वादी यांनी याच अर्जा पाठीमागे म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. वादीचे कथनानुसार, सदर अर्ज व त्यातील कारणे खरी व बरोबर नाहीत. सबब प्रतिवादी चा अर्ज नामंजूर करण्यात यावा व मंजुर करावायाचा झाल्यास वादीस खर्चाची रक्कम रुपये १०,०००/– प्रतिवादी कडुन देण्याबाबत आदेशीत करण्यात यावे अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी यांना दिनांक १२/१२/२०२३ रोजी समन्सची बजावणी होवून ते दिनांक १५/१२/२०२३ रोजी प्रकरणात हजर झाले. त्यांना समन्स बजावणी झालेपासुन कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत

देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. प्रस्तुत अर्ज दिनांक २६/०४/२०२४ रोजी दिला आहे. यावरुन कैफीयत दाखल करण्यास साधारणपणे दिड महिन्यांचा विलंब झाला आहे. प्रस्तुत दावा हा खरेदीखत रद्द बातल करुन मिळणेकरीता व जाहिर ठरावाकरीता दाखल केला असून प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, त्यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांची कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत वादीस खर्चाची रक्कम देण्याचे अटीवर प्रतिवादी  यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.१५) प्रतिवादी यांनी वादीस खर्चाची रक्कम रुपये २००/- देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2024.04.29 17:55:49 +0530

**( ए. एन. कुलकर्णी )**

दिनांकः-२६/०४/२०२४.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, श्रीगोंदा
ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.